विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष ५ । अंक २ । सप्टेंबर २०२२ । मासिक । मूल्य रुपये १०० | AED 10 | USD 2 । www.panthastha.com

या अंकात - संपादकीय । अनिवासी भारतीयांचे रेमिटन्स - २०२०-२१ - विश्लेषण । निवासी भारतीय - आर बी आय और फेमा नियम । अनिवासी भारतीयांसाठी बँकिंग व आयकर तरतुदी



जगभर स्थलांतरित झालेल्या अनिवासी भारतीयांची घनता दाखवणारा जगाचा नकाशा



www.panthastha.com

फुकट काही घेऊ नका,
देणारा तुमची किंमत शून्य करतो

फुकट काही मागू नका,
तुम्ही स्वतःच तुमची किंमत शून्य करता

फुकट काही देऊ नका,
घेणाऱ्याला तुमची खरी किंमत कधीच कळणार नाही.

डॉ संदीप कडवे
बिझनेस मेंटॉर
mentor@in3bet.com

Success is never achieved overnight.
Most successful persons have a MENTOR.

You need to increase your chances of success?
You need your own mentor.

in3bet

Incubate Partners

Innovate | Incubate | Invest | Build | Expand | Transform

Mobile: +91 9860678844 Email: mentor@in3bet.com

www.in3bet.com

Business Mentoring | Incubation | Growth | Sustainability | Funding

अनुक्रमणिका

संपादकीय ४

अनिवासी भारतीयांचे रेमिटन्स - २०२०-२१ - विश्लेषण ... ८

निवासी भारतीय - आर बी आय और फेमा नियम ... १२

अनिवासी भारतीयांसाठी बँकिंग व आयकर तरतुदी ... १३

विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

विश्व पांथस्थ
वर्ष ५ अंक २
सप्टेंबर २०२२

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य

राजन ताबडे, अबू धाबी
गजानन खोलगडे, बहरीन
धवल नांदेडकर, फुजेरा
वीरभद्र कारेगावकर, अजमान
नितीन गायकवाड, औरंगाबाद
किशोर मुंढे, अजमान

मखपृष्ठ आणि सजावट
विश्व पांथस्थ आर्टस पुणे

मूल्य ₹ 100 | AED 10| US$2

Vishwa Panthastha
Year 5 Issue 2
September 2022

First Marathi Monthly For NRI Maharashtrian

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde, Abu Dhabi
Gajanan Kholgade, Bahrain
Dhawal Nandedkar, Fujerah
Veerbhadra Karegaonkar, Ajman
Nitin Gaikwad - Aurangbad
Kishor Mudhe, Ajman

Cover & Design
Vishwa Panthastha Arts. Pune

Price : ₹ 100 AED 10 US$ 2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी-२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७ येथे प्रसिद्ध केले.
संपादक - संदीप वसंतराव कडवे
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune -411057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)

या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

अनिवासी भारतीयांनो,

आज काही मूलभूत प्रश्नांची, सिद्धांतांची चर्चा आपण या संपादकीयाच्या निमित्ताने करणार आहोत.

तुम्ही भारत सोडून परदेशात आलात व जमेल तसे प्रयत्न करत स्वतःला व कुटुंबाला सावरले. जिथे राहता तिथे काही गुणात्मक फरक निर्माण केला. म्हणूनच तुम्हाला कुणी भारतात मिळाले असते त्यापेक्षा चार पैसे जास्त दिले. बहुसंख्य अनिवासी भारतीयांच्या स्थलांतराचे मूळ याच प्रस्तावनेत आहे. तुमची गरज जिथे आहे व त्या गरजेचे मोल ज्या ठिकाणी केले जाते त्या ठिकाणी तुम्ही पोहोचलात.

तुमची गरज कुणाला आहे, हे तुम्हाला माहित आहे का किंवा माहित होते का? हे ज्यांनी ओळखले व त्याप्रमाणे पावले टाकली, त्या व्यक्ती आयुष्यात पुढे गेल्या. ज्यांना तुमची अर्थात तुमच्या कौशल्याची, मदतीची, ज्ञानाची, अनुभवाची गरज आहे, त्यांना तुमच्या देखील काही गरजा आहेत याची जाणीव आहे का? तुमच्या कौशल्याचे, ज्ञानाचे, अनुभवाचे, मदतीचे मोल त्यांनी ओळखून त्याप्रमाणे तुम्हाला आर्थिक, सामाजिक व वैयक्तिक मानसन्मान दिला का? या सर्वांचे उत्तर जर सकारात्मक असेल तर या व्यक्ती केवळ पुढेच गेल्या असे नाही, तर, त्याची सर्वांगीण प्रगती झाली असेच आपण समजू. एका व्यक्तीची प्रगती हि त्या व्यक्तीच्या संपूर्ण कुटुंबाला सहाय्यक असते, त्या कुटुंबाची देखील प्रगती होते. समाज हा अशा अनेक कुटुंबांनी निर्माण होतो. ज्याठिकाणी व्यक्ती प्रगत व सुखी त्याठिकाणी कुटुंब प्रगत व सुखी व ज्याठिकाणी कुटुंब प्रगत व सुखी तो समाज प्रगत व सुखी. जो समाज प्रगत व सुखी होतो ते राष्ट्र, तो देश प्रगत व सुखी होते.

चांगली नीतिमूल्ये कोणती ? तर स्वकष्टाचे खा, फुकट काही घेऊ नका, फुकट काही मागू नका, इतरांना फसवू नका, प्रामाणिक रहा, लोकांची दिशाभूल करू नका, नवनिर्मितीत आनंद मिळवा, चुगली चहाड्या करू नका, चोरीमारी करू नका, अन्याय करू नका, अन्याय सहन करू नका, इतरांना सन्मानाने, प्रेमाने वागवा, इतरांकडून प्रेमाची सन्मानाची अपेक्षा करा, जिथे गरज नाही, जिथे फसवणूक होते, जिथे अपमान होतो तिथे जाऊ नका, जिथे सन्मान होईल जिथे गरज आहे तिथेच जा. हे सगळे इतके साधे आहे. समाज हा याच गृहीतकांवर आधारित नीतिमूल्यांवर चालतो. अनेक वर्षांपासून.

ज्या ठिकाणची नीतिमूल्यं चांगली, तो समाज प्रगतिशील, निकोप व सुखी असतो. माझे ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, अमेरिका, आफ्रिका, यु ए ई, बहरीन, कुवैत व इतर काही देशातील मधील अनेक मित्र, विश्व पांथस्थचे वाचक, हितचिंतक, पांथस्थ परिवाराचे अनेक सदस्य हे त्यांच्या देशात, म्हणजे ज्या देशाने त्यांना आर्थिक लाभ, मानसन्मान, स्थैर्य दिले त्या देशात सुखी आहेत. इथे एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे कि या सर्व देशांनी अनिवासी भारतीयांना सामावून घेतले, विनाकारण स्थानिकत्वाचा भावनिक मुद्दा लावून धरत हुसकावून नाही लावले. अनिवासी भारतीयांचे अस्तित्व या देशांनी दाखवलेली व्यावसायिक उदारतेवरच अवलंबून आहे. भारतातच राहिले असते तर त्यांना कदाचित इतके मोठे घर विकत घेता आले नसते, बँकेत ठेवी ठेवता आल्या नसत्या, मानसन्मान मिळाला नसता, आपल्याला काही चांगले निर्माण करता येते याचा त्यांना साक्षात्कारच झाला नसता कारण त्याप्रमाणे त्यांना वावच मिळाला नसता. तो वाव, ती संधी त्यांना परदेशात मिळाली. त्यांचे त्यांनी चीज केले. यशस्वी

झाले व याचा आम्हाला अतिशय अभिमान आहे, आनंद आहे. काही जण शिक्षणाच्या निमित्ताने परदेशात गेले, तिथेच नोकरी मिळाली, लग्न केले, स्थायिक झाले. काही जण भारतात शिक्षण पूर्ण करून नोकरीसाठी परदेशात गेले, नंतर कुटुंबाला तिकडे नेले, स्थायिक झाले. पांथस्थ परिवारातील अनेक जण असे आहेत, त्यांनी परदेशात स्थिरस्थावर झाल्यावर तिथे उद्योग, धंदा, व्यवसाय सुरु केला व यशस्वी झाले. माझे बरेच वर्गमित्र अमेरिका जर्मनी न्यूझीलंड कॅनडा ऑस्ट्रेलिया रशिया येथे तीन दशके स्थिरस्थावर झाली आहेत. नवी पिढी परदेशात स्थिरावतेय. मस्कत चे एक मराठी व्यावसायिक, कित्येक वर्ष मस्कत मध्ये राहिले, खूप वेळा व्यवसायात अडचणी आल्या, भारतात परत आले, पुन्हा मस्कत ला गेले, पुन्हा जिद्दीने उभे राहून व्यवसायात यशस्वी झाले. लंडन मध्ये ऍग्रीकल्चर इम्पोर्ट, वेरहौसिंग, डिस्ट्रिब्युशन यात यशस्वी उद्योग केलेले दोन मराठी भारतीय तरुण आहेत. आफ्रिकेला जाणारे अनेक मराठी व्यवसाययिक हे तिथे अतिशय उत्तम काम करत आहेत. आफ्रिकेचे काही देश अतिशय सुंदर आहेत, लोकं चांगली आहेत, काम करण्यास वातावरण चांगले आहे. त्यामुळे परदेशात जाणे म्हणजे केवळ अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, सिंगापूर येथे जाणे नाही तर आफ्रिका, आखाती देश, रशिया, अनेक दक्षिण अमेरिकन देश, न्यूझीलंड येथे देखील अनेक मराठी भारतीय अतिशय उत्तम करिअर, उद्योग, व्यवसाय करत आहेत, हि खूप अभिमानाची बाब आहे. अशा अनेक यशस्वी मराठी भारतीयांची यशोगाथा आपण पांथस्थ च्या माध्यमातून मांडत आलो आहोत, याहीपुढे त्यांच्या मुलाखती, लेख आपण प्रसिद्ध करत राहूच.

आता दुसरा मुद्दा. आणि हा पहिल्या मुद्याइतकाच किंवा त्याहीपेक्षा जास्त महत्वाचा आहे.

तुम्ही तुमची ज्या ठिकाणी गरज आहे तिथे गेलात, यशस्वी झालात हि चांगली गोष्ट आहे. परंतु ज्या ठिकाणी तुम्ही होतात त्या ठिकाणी तुमची गरज खरंच होती का ? नव्हती तर का नव्हती? म्हणजे परदेशात जशी गुणांना वाव देणारी पोषक संस्कृती, अर्थव्यवस्था, सामाजिक व्यवस्था, राजकीय व्यवस्था आहे तशी तुमच्या मूळ गावी, राज्यात, देशात का निर्माण झाली नाही ? किंबहुना या गुणांना मारक अशी संस्कृती, अर्थव्यवस्था, सामाजिक व्यवस्था, राजकीय व्यवस्था कुणी व का निर्माण केली? किंवा अशी नकारात्मक व्यवस्था खरंच भारतात आहे का? गुणी, अनुभवी, शिक्षित, चांगल्या हेतूंनी प्रेरित, महत्वाकांक्षी भारतीयांना भारतात, महाराष्ट्रात व इतर राज्यात खरंच वाव नाही का? नसेल तर का नाही? याचा गंभीरपणे विचार आपण सर्वानीच केला पाहिजे.

समजा तीन दशकापूर्वी अशी पोषक परिस्थिती नव्हती, परंतु आता तरी परिस्थिती सुधारली आहे कि अजूनच बिघडली आहे? याबाबत काही अनिवासी भारतीयांशी बोललो. तेव्हा त्यांचे असे मत पडले कि काही गोष्टी जरूर सुधारल्या आहेत. उदारहणार्थ रस्ते सुधारले आहेत, मोबाईल नेटवर्क वाढले आहे, शहरांची वाढ झाली आहे. ठिकठिकाणी मॉल्स सुपरमार्केट झाले आहेत. जवळपास सगळ्या परदेशी वस्तू आता भारतात मिळतात. वगैरे. काय झाले नाही असे विचारले कि विचारात पडतात. विकास झाला तर अन्न, वस्त्र, पाणी, वीज, आरोग्य व शिक्षण या मूलभूत गरज स्वस्त झाल्या का ? नाही तर का नाही? आपमतलबी लोकांना प्रश्न विचारलेले आवडत नाही. अनाअवस्थेसाठी, दुर्दशेसाठी जबाबदार लोकांना प्रश्न विचारले गेले पाहिजेत. त्यांना जबाबदार धरले गेले पाहिजे. भारतात जर इतका विकास झाला तर तुम्ही भारतात परत का येत नाही असे विचारले कि त्यातील काही जण फारच खवळतात. अंधभक्तीचे यापेक्षा चांगले उदाहरण नसेल. त्यातील काही समजदार अनिवासी मात्र प्रांजळपणे

अजून बरेच काही करायचे बाकी आहे हे मान्य करतात. महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढली आहे, विकास नाही अर्थव्यवस्थेला सूज आली आहे देखील जाणकार कबुल करतात. सामाजिक प्रकल्पात हातभार लावण्याची इच्छा प्रदर्शित करतात. सहभागी होतातही. हि जमेची बाजू आहे. दुबई व इतर अनेक देशात वास्तव्य करणारे पांथस्थ कोविड काळात व इतर कारणांमुळे अडचणीत सापडले, पण नाईलाज झाल्याशिवाय भारतात परत येणार नाही हि त्यांची भूमिका मात्र बदलत नाही. त्यालाही कारणे आहेत व ती योग्य असतीलही.

मुद्दा पुन्हा तोच. भारतात किंवा परदेशात, तुम्ही अशा ठिकाणी राहताय का, काम करताय का, ज्या ठिकाणी तुमची गरज आहे? असेल तर उत्तम. परंतु तुमची गरज नाही, अशा नोकरीत, देशात, उद्योगात तुम्ही जर बळजबरीने राहत असाल तर मात्र ती परिस्थिती वाईट आहे. बहुतांशी लोक गरज नसेल, अपमान होत असेल तर स्वतःच्या कुटुंबात देखील आजकाल राहत नाहीत. भारतात पदोपदी नातेवाईकांकडून, नोकरशाहीकडून, राजकारण्यांकडून, धार्मिक उन्मादी लोकांकडून, गावगुंडांकडून, शेजाऱ्या पाजार्यांकडून, समाजातील विशिष्ट घटकांकडून त्रास होतो म्हणून परदेशात राहणाऱ्यांची संख्या मोठी आहे. तुमच्या आसपास देखील हेच घडत असेल. शेवटी माणसे जगण्यासाठी पदोपदी लढण्याऐवजी जिथे जगण्यासाठी योग्य वातावरण मिळेल तिकडे स्थलांतर करतात. दोनशे वर्षांपूर्वी डच, इंग्रज, पोर्तुगाली यांनी चहाच्या मळ्यात, उसाच्या शेतात वेठबिगारी गुलाम कामगार म्हणून जहाजे भरभरून भारतातून लोकं नेली. ती पिढी गुलामगिरीत खपली. पण त्यांचे वारस मात्र स्वकर्तृत्वावर त्या परक्या देशात मोठे झाले. काहीजण त्या देशांचे राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री, मोठे उद्योजक, मान्यवर झाले. हे नक्कीच प्रचंड समाधानकारक व अभिमानास्पद आहे. परंतु याचा राजकीय लाभ घेण्यासाठी अनेकजण पुढे येतात, स्वतःचा उदोउदो करून घेतात व त्यांचा वापर करून घेतला कि त्यांना फेकून देतात हे मात्र खूप क्लेशदायक आहे. परदेशात असलेला नामवंत भारतात काही दिवसासाठी आला तर चालते, दोन दिवस आदरसत्कार होतो, पण तोच पांथस्थ मात्र काही आठवडे भारतात महाराष्ट्रात राहिला तर रिकामटेकडे उपटसूंभ, सरकारी कार्यालयाचा शिपाई ते विभागाचा मंत्री, सर्वच जण त्याकडे केवळ असूयेने, त्याचा कसा स्वार्थी वापर करून घेता येईल या भावनेने त्याची अडवणूक करून त्रास देतात असा अनुभव कित्येक अनिवासी भारतीयांनी घेतला आहे. तो त्रास पुन्हा होऊ नये म्हणून पुन्हा अनेक जण येथील व्यवस्थेला, वातावरणाला, मानसिकतेला कंटाळून पुन्हा भारताबाहेर निघून जातात. जे इथेच राहतात ते शक्यतो सगळ्या काटकटींपासून दूर, स्वतःच्या सुरक्षित कोशात राहतात. त्यांचा ना समाजाला उपयोग ना त्यांच्या आप्तांना. अशा एकट्या पडलेल्या वरिष्ठ नागरिकांना लुबाडणारे देखील आपल्याच समाजात आहेत हे देखील लक्षात ठेवले पाहिजे.

हि परिस्थिती बदलण्यासाठी एका विचारमंथनाची आवश्यकता आहे. कृतीची आवश्यकता आहे. नुकताच दहीहंडीचा सण झाला, आता गणपतीचे दिवस चालू आहेत. उत्सवाचे दिवस चालू आहेत. तुम्ही आसपास नजर टाकली तर असे लक्षात येते कि काही संभावित स्वयंघोषित नेते, लोकांकडून वर्गणी गोळा करून या सार्वजनिक उत्सवाचा स्वतःच्या उदोउदोसाठी वापर करून घेतात. सगळेच कसे इव्हेंट मॅनेजमेंट झाले आहे. भाड्याचे कलाकार, भाड्याचे प्रेक्षक, भाड्याचे यजमान. दणदणाट जास्त संभाषण कमी. त्यामुळे या उत्सवातील भाव हरपला आहे. लोकसहभाग किंवा स्वयंस्फूर्तीने समाजाने सामाजिक उत्सवात सामील होणे कमी झाले आहे. हे सर्वसामान्यांचे सामील होणे जसे जसे कमी झाले, तसे तसे दुर्दैवाने उत्सव हायजॅक झाले आहेत. गांधी हायजॅक झाले आहेत. आंबेडकर हायजॅक झाले आहे. आता बाळासाहेब ठाकरेही हायजॅक होत आहेत. बऱ्याच अनिवासी भारतीयांचे त्यांच्या अनुपस्थितीत घरच हायजॅक झाले आले. याचे कारण म्हणजे आपली गरज जिथे होती व ज्या गरजेचे सन्मानाने

मोल मिळाले तिथे आपण गेलो खरे, पण आपल्या मागे अनेक भुरट्यांनी आपल्या घरावर, असहाय पूर्वजांवर, गलितगात्र समाजावर ताबा मिळवला. त्यांना मानसिकरीत्या, वैचारिकरीत्या, आर्थिकरित्या, सामाजिकरीत्या, राजकीयरित्या स्वतंत्र करणे अशी एक वेगळीच जबाबदारी आता परदेशातील किंवा किंवा परदेशातून परत भारतात आलेल्या अनिवासी भारतीयांवर येऊन पडली आहे. अनिवासी भारतीयांवर यासाठी, कारण तुम्ही या सर्व व्यवस्थेपासून दूर आहात, स्वयंपूर्ण आहात, जागरूक आहात व मुख्य म्हणजे या व्यवस्थेतील नागरिकांसारखे अगतिक व लाचार नाही आहात. त्यामुळे वारशाच्या, प्रतिकांच्या, चिन्हांच्या, मूल्यांच्या, आदर्शाच्या या सरसकट चोरीकडे तुमचे गंभीरपणे लक्ष गेले पाहिजे.

राज्याची देशाची समाजाची परिस्थिती काही वेगळी नाही. कुठल्याही कार्यक्रमाचा, योजनेचा, प्रकल्पाचा, यजमान कोण आहे यावर बरेच काही अवलंबून असते. जर सगळ्याच सामाजिक, आर्थिक व राजकीय यंत्रणांवर स्वार्थी, अडाणी व केवळ स्वतःचा उदोउदो करणाऱ्या व्यक्तींचेच वर्चस्व प्रस्थापित झाले तर प्रगती होणे दूर, अधोगतीच होईल, होतेच आहे, पण ती लपवली जातेय, तुमचे लक्ष भरकटवले जातेय. या सगळ्या अधोगतीची जबाबदारी घेण्यासदेखील कुणीच पुढे येणार नाही. श्रीलन्केत देखील तेच झाले, पाकिस्तानात देखील तेच झाले, अनेक पूर्वीच्या प्रगत परंतु आताच्या दिवाळखोर देशात देखील तेच झाले आहे. तुमच्या आसपास देखील हेच घडत असेल. पांथस्थाच्या विचारसरणीनुसार तुम्ही जगात कुठे राहू शकता, गरजा मर्यादित ठेवून आयुष्याच्या प्रवासाचा आनंद लुटू शकता. फक्त मायदेशातच राहावे असे नाही. पण तुम्हाला जर मायदेशाची आठवण आली व परत यावेसे वाटले तर तो देश सुरक्षित राहील, याची काळजी मात्र तुम्हाला असली पाहिजे. आज अनिवासी पाकिस्तानी, अनिवासी श्रीलंकन, अनिवासी पोर्तुगाली, अनिवासी मध्य आशियायी, अनिवासी पूर्व युरोपिअन नागरिक यांना स्वदेशच शिल्लक राहिला नाही, म्हणजे परत यावेसे वाटले तर त्या देशाची तशी परीस्थितीच राहिली नाही. त्यामुळे ते अनिवासी पांथस्थ हे जवळपास कायमचे विस्थापित झाले आहेत. फाळणीच्या वेळी निर्वासित झाले तसे. काश्मीरी विस्थापित झाले तसे. असा इतिहास आहे. बरीच नामवंत घराणी केवळ जबाबदार वारसदार मिळाला नाही म्हणून व अंतर्गत कलहामुळे नामशेष झाली. त्यामुळे आपल्या बाबतीत असे होऊ नये म्हणून देखील आपण सर्वांनी विशेषतः अनिवासी भारतीयांनी विचारपूर्वक आपली भूमिका ठरवली पाहिजे. आज तुम्ही देशी भारतीयांपेक्षा कदाचित चांगल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीत राहत असाल. जिथे तुमची गरज आहे व त्या गरजेचे मोल आहे तिथेच राहा, पण जर देशासाठी, ज्या समाजात आपण वाढलो, त्या समाजासाठी काही करण्याचा विचार मनात असेल तर मात्र वस्तुनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारून भारतात ज्यांना खरोखर तुमची म्हणजे तुमच्या समृद्ध व ग्लोबल विचारांची, अनुभवाची, नेतृत्वाची, आर्थिक, सामाजिक व राजकीय मदतीची गरज आहे तिथे आपले बहुमूल्य योगदान नक्की द्या. प्रसंगी अशी मदत स्वीकारणारी माणसे एव्हढी शिकलेली, मोठ्या मनाची व तुमच्या मदतीचे मोल जाणणारी नसतीलही. पण तुम्ही आयुष्यभर इतर ठिकाणी म्हणजे परदेशात सुखवस्तू रीतीने जगता येईल एव्हढे कमावले असेल तर ज्यांना खरोखर तुमच्या मदतीची गरज आहे फक्त व फक्त अशांनाच तुमची मदत करा. भारतात फेकू फुकटे गरजू भरपूर आहेत, त्यांच्यापासुन सावध राहा, परंतु खरोखरचे गरजू भरपूर आहेत, हे देखील लक्षात ठेवा. जमले तर मदत करा. पण जिथे आहेत तिथे पाय रोवून निर्धाराने व आनंदाने जगा. आनंदाचीच निर्मिती करा, आनंदाचीच पखरण करा. तुमच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी व येणाऱ्या उत्सवांसाठी विश्व पांथस्थ तर्फे मनापासून शुभेच्छा ! सक्रिय राहा, सजग राहा !

डॉ संदीप कडवे

३ सप्टेंबर २०२२, पुणे.

अनिवासी भारतीयांचे रेमिटन्स - २०२०-२१ - विश्लेषण

फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट नंतर रेमिटन्स इनफ्लो हा गरीब व मध्यम अर्थव्यवस्था असलेल्या देशांसाठी अतिशय महत्वाचा आर्थिक आधार आहे. भारतातील आवक रेमिटन्स हे चालू खात्याच्या प्राप्तीसाठी एक महत्वाचा व कठीण काळातही मदतीचा हात देणारा स्त्रोत असल्याचे सिद्ध झाले आहे. अंतर्देशीय रेमिटन्स इनफ्लो अर्थात अनिवासी प्रवासी हे स्वतःच्या देशात जे पैसे पाठवतात ते बहुतंशी परोपकाराच्या हेतूने पाठवत असल्याचे आढळले आहे, गंतव्य देशातील संसर्ग दर आणि स्त्रोत देशांमधील लॉकडाऊनच्या कडकपणामुळे. संदर्भ कालावधी 2020-21 साठी रेमिटन्सवरील सर्वेक्षणाच्या पाचव्या फेरीत असे आढळून आले आहे की आखाती देशांचा वाटा कमी झाला आहे, याचे कारण म्हणजे स्थलांतराचा वेग कमी झाला आहे आणि अनौपचारिक क्षेत्रांमध्ये भारतीय डायस्पोराची उपस्थिती जास्त आहे व याच क्षेत्राला महामारीच्या काळात सर्वाधिक फटका बसला होता. पुढे, 2020-21 मध्ये एकूण रेमिटन्समध्ये लहान आकाराच्या व्यवहारांचा वाटा वाढल्याने कोविड-19 ने तणावग्रस्त उत्पन्न परिस्थितीचा प्रभाव स्पष्ट झाला. बँक-समूहनिहाय व्यवहारांमध्येही फरक दिसून आला कारण सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी बाजारातील हिस्सा गमावला तर खाजगी बँकांनी रेमिटन्स व्यवसायात त्यांचे वर्चस्व कायम ठेवले.

Chart 1: Inward Remittances in EMEs



Source: Authors' calculations based on World Bank data.

Chart 2: Remittances as a Share of GDP



Source: Authors' calculations based on World Bank data.

गेल्या दशकात, उदयोन्मुख बाजार अर्थव्यवस्थांकडे (ईएमई) रेमिटन्स पाठवण्याचा ओघ सातत्याने वाढला आहे (चार्ट 1). किंबहुना, अनेक देशात रेमिटन्स चा ओघ हा थेट परदेशी गुंतवणुकीपेक्षा जास्त आहे. भारत फिलिपिन्स पाकिस्तान बांग्लादेश सहित गरीब व मध्यम आकाराच्या अर्थव्यवस्थेत रेमिटन्स मुळे आलेली रक्कम हि जीडीपीच्या ३ टक्क्यां पेक्षा जास्त आढळून आली आहे.

संयुक्त अरब अमिराती (UAE), युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (USA) आणि सौदी अरेबिया ही गेल्या दोन दशकांपासून भारतीय स्थलांतरितांची तीन प्रमुख ठिकाणे आहेत. भारतातील एकूण स्थलांतरितांपैकी, 2020 च्या अखेरीस 48.6 टक्के यूएई, यूएसए आणि सौदी अरेबियामध्ये होते (तक्ता 5).

Chart 5: Distribution of Indian Migrants Across Top Host Countries



Sources: Authors' calculations based on UN DESA data.

2020 मध्ये भारत हा आंतरराष्ट्रीय स्थलांतराचा सर्वात मोठा स्त्रोत राहिला.

कोविड-19 महामारीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक ताणामुळे २०२०-२१ या कालावधीत आखाती देशांकडून आवक पाठवण्याचा वाटा झपाट्याने घसरला, असे आरबीआयच्या लेखात म्हटले आहे. आर्थिक मंदी, तेलाच्या किमतीमध्ये घट, कठोर कामगार कायदे, राष्ट्रीयीकरण धोरणे, उच्च वर्क परमिट नूतनीकरण शुल्क आणि कर यामुळे गेल्या पाच वर्षांत भारतातून GCC मध्ये स्थलांतर मंदावले. या घटकांसह साथीच्या रोगाने प्रेरित प्रवास निर्बंध आणि प्रदेशाच्या कामगार बाजारपेठेतील बदलांमुळे रोजगाराच्या संधी कमी झाल्या आणि ब्लू-कॉलर कामगारांना संधी कमी झाली. " भारताच्या आवक रेमिटन्समध्ये GCC (गल्फ कोऑपरेशन कौन्सिल) प्रदेशातून पाठवलेल्या रकमेचा वाटा 50 टक्क्यांहून कमी झाल्याचा अंदाज आहे. 2020-21 दरम्यान आखाती देशांमधून पाठवल्या जाणाऱ्या रकमेत झालेली घट ही स्थलांतराची मंदावलेली गती आणि अनौपचारिक क्षेत्रांमध्ये भारतीय डायस्पोराची मोठी उपस्थिती दर्शवते ज्याला

Table 1: India's Emigration to the GCC Region (in Lakhs)

GCCs	2015	2017	2019	2020
Saudi Arabia	3.1	0.8	1.6	0.4
UAE	2.3	1.5	0.8	0.2
Kuwait	0.7	0.6	0.5	0.1
Oman	0.9	0.5	0.3	0.1
Qatar	0.6	0.2	0.3	0.1
Bahrain	0.2	0.1	0.1	0.0
Total	**7.6**	**3.7**	**3.5**	**0.9**

Source: Based on emigration clearance data, MEA, Government of India.

महामारीच्या काळात सर्वाधिक फटका बसला होता. परिणामी, 2020-21 मध्ये एकूण रेमिटन्समधील लहान आकाराच्या व्यवहारांचे प्रमाण वाढले.

दुसरीकडे, यूएस, यूके आणि सिंगापूर सारख्या प्रगत अर्थव्यवस्था देशासाठी रेमिटन्ससाठी महत्त्वपूर्ण स्त्रोत म्हणून उदयास आल्या, 2020-21 मध्ये एकूण पेमेंटपैकी 36 टक्के वाटा आहे, असे लेखात आरबीआय सर्वेक्षणाचा हवाला देऊन म्हटले आहे.

Chart 3: Inbound Remittances in Major Receipt Economies



Sources: The Global Knowledge Partnership on Migration and Development (KNOMAD), World Bank.

एकूणच, कोविड-19 ची कठीण परिस्थिती असूनही, भारतातील आवक रेमिटन्स हे चालू खात्यातील प्राप्तींचे एक लवचिक स्त्रोत असल्याचे सिद्ध झाले आहे, असे RBI च्या जुलै बुलेटिनमध्ये प्रकाशित झालेल्या लेखात म्हटले आहे.

Chart 10: Country-wise Sources of Remittances



Sources: RBI Remittances Survey, 2020-21.

2020-21 मध्ये एकूण रेमिटन्सच्या 23 टक्के वाटा यूएसने यूएईला सर्वोच्च स्त्रोत देश म्हणून मागे टाकले.

हे जागतिक बँकेच्या अहवाल (2021) ची पुष्टी करते आणि भारताच्या रेमिटन्स वाढीचा एक महत्त्वाचा घटक म्हणून यूएसमधील आर्थिक सुधारणा किती मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे हेच सिद्ध करते. एकूण रेमिटन्सच्या जवळपास 20 टक्के वाटा आहे यु एस चा आहे, असे लेखात म्हटले आहे.

केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटक या पारंपारिक रेमिटन्स प्राप्त करणाऱ्या राज्यांचा वाटा, ज्यांचे GCC क्षेत्रामध्ये मजबूत वर्चस्व होते, ते 2020-21 मध्ये जवळपास निम्म्यावर आले आहेत, ज्याचा वाटा एकूण रेमिटन्सच्या केवळ 25 टक्के आहे, तर महाराष्ट्र केरळला मागे टाकणारे सर्वोच्च रेमिटन्स प्राप्त करणारे राज्य म्हणून उदयास आले आहे.

Chart 11: State-wise Share of Remittances Receipts



Sources: RBI Remittances Survey, 2020-21.

"यजमान देशाच्या गतिशीलतेव्यतिरिक्त, वेतनातील फरक कमी करणे, या राज्यांमधील व्यावसायिक पद्धती बदलणे आणि GCC प्रदेशात व्हाईट कॉलर स्थलांतरित कामगार वाढवणे आणि इतर राज्ये आणि आशियाई देशांमधील कमी वेतनाच्या अर्ध-कुशल कामगारांच्या प्रवेशामुळे ही रचना बदलली असावी असे रिपोर्ट मध्ये नमूद केले आहे.

याउलट, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा आणि पश्चिम बंगालमधून अलिकडच्या वर्षांत आखाती देशांमध्ये होणारे स्थलांतर वाढले आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, 2020 मध्ये GCC क्षेत्रासाठी मंजूर झालेल्या स्थलांतर मंजुरीपैकी 50 टक्क्यांहून अधिक या राज्यांसाठी होत्या.

कमी वेतनावरील अकुशल कामगारांच्या वर्चस्वामुळे, तथापि, 2020-21 मध्ये महाराष्ट्र आणि दिल्लीचा वाटा लक्षणीय वाढला असताना, पाठवल्या जाणाऱ्या रकमेतील त्यांचा वाटा लक्षणीयरित्या कमी राहिला आहे.

या लेखात असा निष्कर्षही काढण्यात आला आहे की, परदेशी बँकांनी विशेषतः सिंगापूरमधून पाठवल्या जाणाऱ्या व्यवहारांमध्ये किरकोळ वाढ केली असली तरी, बहुतांश रेमिटन्स खाजगी क्षेत्रातील बँकांमधून पाठवले जात आहेत, त्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा क्रमांक लागतो.

त्यात असेही नमूद करण्यात आले आहे की, महामारीच्या काळात एकूण रेमिटन्समध्ये वाटा मिळवणाऱ्या छोट्या आकाराच्या व्यवहारांवरून तणावग्रस्त उत्पन्नाची परिस्थिती स्पष्ट होते.

तरीही, G20 गटातील मेक्सिकोनंतर भारत हे दुसरे सर्वात स्वस्त रेमिटन्स प्राप्त करणारा देश आहे, इतर देशांसाठी रेमिटन्स पाठवण्याची कॉस्ट भारत व मेक्सिकोपेक्षा जास्त आहे. त्यामुळे अशा महागड्या कॉरिडॉरमध्ये मनी ट्रान्सफर सर्व्हिस स्कीम (MTSS) ची व्याप्ती वाढवण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे त्यात म्हटले आहे आणि प्रेषण सेवा प्रदात्यांनी डिजिटल तंत्रज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून बदलत्या काळाशी जुळवून घेणे आवश्यक आहे.

निवासी और अनिवासी भारतीय - आर बी आय और फेमा नियम

भारत में निवास करने वाली व्यक्ति को फेमा, 1999 की धारा 2 (v) में निम्नानुसार परिभाषित किया गया है:

i) पूर्ववर्ती वित्तीय वर्ष के दौरान एक सौ बयासी दिन से अधिक दिन भारत में निवास करने वाला व्यक्ति, लेकिन इसमें निम्नलिखित शामिल नहीं है:

(ए) कोई व्यक्ति नीचे दिये गए किसी भी मामले में भारत से बाहर गया है अथवा जो भारत के बाहर निवास करता है:

(क) भारत के बाहर नौकरी करने के लिए अथवा नौकरी करने हेतु , अथवा

(ख) भारत के बाहर कोई कारोबार अथवा व्यवसाय के लिए; अथवा

(ग) कोई अन्य प्रयोजन, ऐसी परिस्थितियों में अनिश्चित अवधि के लिए भारत के बाहर रहने के इरादे के बारे में सूचित करें।

बी) कोई व्यक्ति नीचे दिये गए किसी भी मामले में भारत में निवास करने आया है अथवा जो भारत में निवास करता है या अन्यथा रूप में :

(क) भारत में नौकरी करने के लिए अथवा नौकरी करने हेतु , अथवा

(ख) भारत में कोई कारोबार अथवा व्यवसाय के लिए; अथवा

(ग) कोई अन्य प्रयोजन, ऐसी परिस्थितियों में अनिश्चित अवधि के लिए भारत में रहने के इरादे के बारे में सूचित करें।

ii) भारत में पंजीकृत अथवा निगमित कोई व्यक्ति अथवा निगमित निकाय;

iii) भारत के बाहर के निवासी द्वारा भारत में स्वाधिकृत अथवा नियंत्रित कोई कार्यालय, शाखा अथवा एजन्सि;

iv) भारत के निवासी द्वारा भारत में स्वाधिकृत अथवा नियंत्रित कोई कार्यालय, शाखा अथवा एजन्सि;

उदारीकृत विप्रेषण योजना के तहत, अवयस्क सहित सभी निवासी व्यक्तियों को अनुमत चालू तथा पूंजी खाता लेनदेनों के लिए अथवा दोनों के लिये संयुक्त रूप में प्रति वित्तीय वर्ष (अप्रैल-मार्च) 250,000 अमरीकी डॉलर तक की राशि मुक्त रूप से विप्रेषित करने के लिए अनुमति दी गयी है। साथ ही निवासी व्यक्ति केवल 250,000 अमरीकी डॉलर की सीमा के भीतर दिनांक 26 मई 2015 के फेम (कैट) संशोधन नियमावली, 2015 की अनुसूची III के पैरा 1 में उल्लिखित प्रयोजनों के लिए विदेशी मुद्रा सुविधा का लाभ उठा सकते हैं। यह योजना दिनांक 4 फरवरी 2014 को 25,000 अमरीकी डॉलर की सीमा के साथ प्रारंभ की गयी थी। एलआरएस सीमा को प्रचलित समष्टि तथा व्यष्टि आर्थिक परिस्थितियों के अनुरूप स्तरों में संशोधित किया गया है। विप्रेषक अवयस्क होने के मामले में एलआरएस घोषणा फॉर्म पर उसके नैसर्गिक अभिभावक के प्रतिहस्ताक्षर होने चाहिए। यह योजना कॉर्पोरेट्स, साझेदारी फ़र्म, HUF, न्यासों आदि के लिए उपलब्ध नहीं है।

अनिवासी भारतीयांसाठी इन्कम टॅक्स व बँकिंग - तरतुदी व नियोजन

प्रश्न 1 :- एनआरआय म्हणजे कोण?

उत्तर :- एखादी 'अनिवासी भारतीय' (एनआरआय) म्हणजे, भारताची नागरिक असलेली भारताबाहेर निवासी असलेली व्यक्ती.

प्रश्न 2 :- पीआयओ म्हणजे कोण?

उत्तर :- 'भारतीय वंशाची व्यक्ती' (पीआयओ) म्हणजे, भारताबाहेर निवासी असलेली, बांगलादेश किंवा पाकिस्तान किंवा केंद्र सरकारने विहित केलेला अन्य देश सोडून, अन्य कोणत्याही देशांची नागरिक असलेली व पुढील अटी पूर्ण करणारी व्यक्ती :-

(अ) भारतीय संविधानाने किंवा नागरिकत्त्व अधिनियम 1955 अनुसार (1955 चा 57) भारताची नागरिक होती अशी व्यक्ती, किंवा

(ब) 15 ऑगस्ट 1947 नंतर भारताचा एक भाग झालेल्या प्रदेशातील व्यक्ती किंवा

(क) भारताच्या नागरिकाचा किंवा वरील खंड (अ) किंवा (ब) मध्ये संदर्भित व्यक्तीचा मुलगा/मुलगी किंवा नातू/नात किंवा पणतु/पणती असलेली व्यक्ती किंवा

(ड) भारताच्या नागरिकाची विदेशी वंशाची पत्नी/पती असलेली किंवा वरील खंड (अ) किंवा (ब) किंवा (क) मध्ये संदर्भित व्यक्तीची विदेशी वंशाची पत्नी/पती.

नागरिकत्व अधिनियम 1955 च्या कलम 7(अ) च्या अर्थामध्ये, 'विदेशातील भारताचा नागरिक' कार्डधारकही समाविष्ट असेल.

प्रश्न 3 :- एखादी अनिवासी व्यक्ती भारतामध्ये कोणकोणती मुख्य खाती उघडू शकते?

अनिवासी (बाह्य) रुपये खाते योजना (एनआरई खाते) [बचत, चालु, आवर्ती, स्थिर ठेव] _**विदेशी मुद्रा (अनिवासी) खाते (बँका) योजना (एफसीएनआर (बी) खाते) [**केवळ मुदत ठेव]

एनआरआय व पीआयओ.

पाकिस्तान व बांगलादेश मधील व्यक्ती/संस्थांनी भारतीय रिझर्व्ह बँकेची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे.

अनिवासी सामान्य रुपये खाते योजना (एनआरओ खाते) [बचत, चालु, आवर्ती, स्थिर ठेव]

रुपयांमधील प्रामाणिक व्यवहार करण्यासाठी भारताबाहेरील निवासी कोणतीही व्यक्ती.

पाकिस्तानी राष्ट्रीयत्व/मूळ वंश असलेल्या व्यक्ती/संस्था आणि बांगलादेशीय मूळ असलेल्या संस्थांनी भारतीय रिझर्व्ह बँकेची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे.

बांगलादेश/पाकिस्तान येथील अल्पसंख्याक जमातीमधील, म्हणजे हिंदु, शीख, बौध्द, जैन, पारशी व ख्रिश्चन व त्या देशाची नागरिक असलेली, व भारतात निवासी असलेली व जिला एलटीव्ही देण्यात आले आहे किंवा जिचा एलटीव्हीसाठीचा अर्ज विचाराधीन आहे अशी व्यक्ती वेळोवेळी सुधारित अधिसूचना क्र. फेमा 5(आर)/2016-आरबी दि. एप्रिल 1, 2016 मध्ये दिलेल्या अटींवर, एखाद्या एडी बँकेमध्ये केवळ एकच एनआरओ खाते उघडू शकते.

भारतामधील पोस्ट ऑफिसे, भारताबाहेर निकासी असलेल्या व्यक्तींच्या नावाने बचत खाती ठेवू शकतात, आणि प्राधिकृत डीलर/प्राधिकृत बँकेमध्ये ठेवलेल्या एनआरओ खात्यांना लागु असलेल्या अटींवर ह्या खात्यात कार्यकृती करण्यास/चालविण्यास परवानगी देऊ शकतात.

संयुक्त खाते

अनिवासी (बाह्य) रुपये खाते योजना (एनआरई खाते)_विदेशी मुद्रा (अनिवासी) खाते (बँका) योजना (एफसीएनआर (बी) खाते)

दोन किंवा अधिक एनआरआय/पीआयओ च्या नावांनी संयुक्तपणे ठेवले जाऊ शकते.

एनआरआय/पीआयओ, निवासी नातलगाबरोबर, 'आधीचा किंवा उत्तरजीवित' धर्तीवर संयुक्तपणे ठेवू शकतात (नातलग - कंपनीज अधिनियम 2013 मध्ये व्याख्या केल्यानुसार). एनआरआय/पीआयओ ह्यांच्या जीवनकालामध्ये निवासी नातलग मुखत्यारनामा धारक म्हणून खाते चालवू शकतो.

अनिवासी सामान्य रुपये खाते योजना (एनआरओ खाते)

दोन किंवा अधिक एनआरआय/पीआयओंच्या नावे संयुक्तपणे ठेवता येऊ शकते.

निवासी व्यक्तींबरोबर 'आधीचा किंवा उत्तरजीवी' धर्तीवर ठेवता येऊ शकते.

स्थिर ठेवीसाठीचा कालावधी

अनिवासी (बाह्य) रुपये खाते योजना (एनआरई खाते)

एक ते तीन वर्षांपर्यंत. तथापि बँकांना, त्यांच्या ॲसेट लायाबिलिटी दृष्टिकोनानुसार तीन वर्षांपेक्षा अधिक कालासाठी एनआरई ठेवी स्वीकारण्यास परवानगी आहे.

विदेशी मुद्रा (अनिवासी) खाते (बँका) योजना (एफसीएनआर (बी) खाते)

एक वर्षापेक्षा कमी नसलेल्या व पाच वर्षांपेक्षा जास्त नसलेल्या मुदतीसाठी

अनिवासी सामान्य रुपये खाते योजना (एनआरओ खाते)

निवासी खात्यांना लागु असल्याप्रमाणे.

परवानगीप्राप्त क्रेडिट्स.

अनिवासी (बाह्य) रुपये खाते योजना (एनआरई खाते) / विदेशी मुद्रा (अनिवासी) खाते (बँका) योजना (एफसीएनआर (बी) खाते)

ह्या खात्यात परवानगी असलेले क्रेडिट्स म्हणजे, भारताबाहेरून केलेली इनवर्ड (आवक) प्रेषणे, त्या खात्यावर उपार्जित होत असलेले व्याज, गुंतवणुकींवरील व्याज, इतर एनआरई/एफसीएनआर (बी) खात्यांमधून केलेले हस्तांतरण, गुंतवणुकींचे परिपक्वतेनंतरचे उत्पन्न (अशा गुंतवणुकी ह्या खात्यामधून किंवा इनवर्ड प्रेषणाद्वारे केल्या असल्यास) भाडे, डिव्हिडंड, पेन्शन, व्याज इत्यादिसारखे विद्यमान उत्पन्न हे **एनआरई खात्यात** परवानगीप्राप्त क्रेडिट समजले जाईल. [केवळ परिवर्तनीय असल्याचे लक्षण न गमावलेली क्रेडिट्स.]

अनिवासी सामान्य रुपये खाते योजना (एनआरओ खाते)

भारताबाहेरून केलेली इनवर्ड प्रेषणे, भारतामधील कायदेशीर येणी (ड्युज्) आणि इतर एनआरओ खात्यांमधून केलेली हस्तांतरणे ही, एनआरओ खात्यातील परवानगीप्राप्त क्रेडिट्स आहेत. उदारीकृत प्रेषण योजनेखाली विहित केलेल्या मर्यादांमधील, एखाद्या निवासी व्यक्तीने, एनआरआय/पीआयओ नातलगाला दिलेली देणगी/कर्ज हे त्या एनआरआय/पीआयओ नातलगाच्या खात्यात क्रेडिट केले जाऊ शकते.

" अनिवासी भारतीयांसाठी इन्कम टॅक्स व बँकिंग – तरतुदी, नियोजन व शंकासमाधान " या विषयावर भारतातील अथवा परदेशातील चार्टर्ड अकाउंटंट फर्म अथवा व्यक्तींकडून कडून शुद्ध सात्विक मराठीत लेख मागवण्यात येत आहेत. लेख दोन किंवा तीन पानी असावा. NRI कडून नेहमी विचारण्यात येणारे प्रश्न व त्यावरचे सयुक्तिक उत्तर असे लेखाचे स्वरूप असावे. लेख सहज समजेल अशा भाषेत असावा. या लेखाचा परिणाम म्हणून लेखकाला NRI तर्फे त्यांचे टॅक्स रिटर्न भरण्यासाठी, टॅक्स प्लांनिंग करण्यासाठी पांथस्थाच्या वाचकांतर्फे विचारणा करण्यात येऊ शकते. त्यानुसार संबंधित CA फर्म तत्पर सल्ला व सेवा पुरवण्यास सक्षम असावी. लेख ॲडव्हर्टोरिअल या स्वरूपात असेल, शुल्क लागू. वाचकांकडून प्रतिसाद असेल तर पुढील अंकात नियमितपणे हे सदर चालवण्याचा विचार केला जाईल.

लेख editor@panthastha.com या इमेल वर पाठवावा.

Stagnancy Vs Stability ... Growth Vs Progress

Most companies content with "Stability" are actually very close to Stagnancy.

Those who may be growing, may not be progressing. And growth cannot be unidimensional.

* We help our clients, investors, entrepreneurs, SMEs and Corporates, achieve Sustainable Growth.

* We help our clients to overcome stagnancy and make them unstable first to then lead towards Stability.

* We represent Investors on Board of Directors of investee company and help manage investment portfolio.

* We help finding exit for existing investments / NPAs
* We help in restructuring existing portfolio.
* We also support as Deal Finder / Venture Scout.

Partner@in3bet.com | Mob - +91 9860678844

in3bet

Incubate Partners

Innovate Incubate Invest Build Expand Transform

www.in3bet.com

Lets Work ... Together .. Today ... For a better tomorrow